# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १९ जुलै, २०१८ / आषाढ २८, १९४० ( शके )**

**(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**
**(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
**(३) पर्यावरण मंत्री**
**(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात एकात्मिक केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अभियान सुरु करण्यात आल्याबाबत

**(१) * ११७००२ श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वशिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण योजनांच्या माध्यमातून शैक्षणिक प्रणालीला गती मिळण्यासाठी सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून "सारे शिकु या, पुढे जाऊ

या" हा संदेश देत ग्रामीण आणि शहरी भागामध्ये प्रत्येक मुलाला शिक्षणाच्या प्रवाहात सक्रीय करुन घेण्याच्या योजनेत सन २०१८-१९ पासून केंद्र सरकारने अमुलाग्र बदल करुन सर्वशिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या तीन्ही योजनांचे एकत्रिकरण करुन समग्र शिक्षा अभियान सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच येत्या शैक्षणिक सत्रापासून समग्र शिक्षा अभियानांतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके दिली जाणार असून या योजनेतून विना अनुदानित शाळांना वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतून विना अनुदानित शाळांना वगळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, समग्र योजनेचे स्वरुप काय आहे व त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजना शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि खाजगी अनुदानित शाळातील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना लागू आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विना अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात येत नाही.

(४) सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या तिन्ही योजना एकत्र करुन समग्र शिक्षा अभियान ही एकात्मिक केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षणाचा समावेश केला आहे. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत**

**(२) * ११७१७७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील-चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी संस्थांनी विना अनुदानतत्वावर सुरु केलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दर महिन्याला वेतन दिले जात नसल्याच्या तक्रारी तंत्रशिक्षण संचालक व तंत्रशिक्षण विभागाकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित महाविद्यालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

माहे एप्रिल २०१८ मध्ये दोन संस्थांविरुद्ध वेतनासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावर चौकशी समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. संबंधित समित्यांनी सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नवी मुंबई व सरस्वती एज्युकेशन सोसायटी, कर्जत संचलित २ व्यावसायिक महाविद्यालयांची चौकशी करून त्याचा अहवाल सादर केला आहे.

चौकशी समित्यांच्या अहवालानुसार दोषी संस्थांनी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे अनियमितता केल्याचे दिसून आले.

(अ) शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन थकविणे

(ब) नियमानुसार भत्ते अदा न करणे

(क) वेतनातून कपात केलेला कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) संबंधितांच्या खात्यात जमा न करणे

(ड) शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर (Ratio) नियमानुसार नसणे

(इ) सहावा वेतन आयोग लागू न करणे

वरील वित्तीय व प्रशासकीय अनियमिततांमुळे, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेव्दारे शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ करिता प्रसिध्द करण्यात आलेल्या Approval Process Handbook नुसार विहीत केलेल्या वेतनविषयक निकषांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले.

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांविरूध्द कारवाई करण्याचा अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेस असल्याने सरस्वती एज्युकेशन सोसायटी, कर्जत या संस्थेंतर्गत असलेल्या व्यावसायिक महाविद्यालयांविरुद्ध कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस कळविण्यात आले आहे. तर, सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नवी मुंबई या संस्थेविरूध्दचा चौकशी अहवाल माहे मे, २०१८ मध्ये प्राप्त झाला असल्याने सदर संस्थेविरूध्द कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस कळविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.वाशिम) येथील नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांबाबत

**(३) * १२१५०९ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.वाशिम) येथे कोटयवधी रुपये खर्च करुन सुरु करण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजना उन्हाळयात बंद पडत असल्याने पाणीटंचाई निर्माण होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नळ पाणी पुरवठा योजनेसाठी अत्यावश्यक असणारी पाणी पुरवठा विहिर चुकीच्या ठिकाणी घेतल्याने काही विहिरींना पाणी लागले नाही, त्यामुळे सदर योजना बंद पडली. तसेच कित्येक विहिरींचे पाणी हे माहे जानेवारी ते माहे फेब्रुवारीमध्येच संपत असल्याने नळ पाणी पुरवठा योजनेसाठी झालेला कोटयवधी रुपयांचा खर्च वाया गेला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

ग्रामपंचायत मालेगांव, ता.मालेगांव, जि.वाशिम ही सन २०१६ मध्ये नगर पंचायत झाली आहे. तत्कालीन मालेगांव ग्रामपंचायतसाठी भूपृष्ठीय उद्भव कुरळा धरणावरुन भारत निर्माण योजनेंतर्गत रु.६०.९९ लाख किंमतीची योजना सन २००९ मध्ये मंजूर करुन पूर्ण करण्यात आली होती.

(३) कुरळा धरणातील अत्यल्प पाणी साठा व उद्भवणारी संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन, जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तावित केल्यानुसार शासनाने मालेगांव शहरासाठी दि. १४ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये तात्पुरती पाणी पुरवठा योजना मंजूर केली आहे. सदर तात्पुरत्या योजनेचे काम पूर्ण करुन दि. १३ एप्रिल, २०१८ पासून सदर योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोयंदेव (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(४) * १२१०६८ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयंदेव (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथील नळयोजना कालबाह्य झाल्याने केवळ आठच महिने नळाद्वारे पाणी पुरवठा होत असून उन्हाळ्यात चार महिने तीव्र पाणी टंचाई निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी सरपंचानी दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास टाकीवर चढून उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावाचा कायमस्वरुपी पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमात या गावाचा समावेश करण्यात आला आहे काय, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर गावाचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ च्या कृती आराखडयात समावेश करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा येथील जिल्हा क्रीडा संकुलातील जलतरण तलाव बंद असल्याबाबत

**(५) * १२०९७० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा क्रीडा संकुल बुलढाणा येथील जलतरण तलाव कार्यान्वित झाल्यापासून कंत्राटी पध्दतीने चालविण्यास दिला असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलतरण तलावाकडे विभागाच्या होणा-या दुर्लक्षामुळे व हलगर्जीपणामुळे देखभाल दुरूस्ती अभावी गत एक वर्षापासून सदर जलतरण तलाव बंद असून त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलतरण तलाव बंद असल्याने विविध शालेय जलतरण स्पर्धेत भाग घेण्या-या खेळाडूंचे व हौशी जलतरण नागरिकांच्या सरावाची गैरसोय होऊन जलतरण स्पर्धेत भाग घेणा-या खेळाडूंच्या गुणवत्तेचा दर्जा ढासळला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार देखभाल दूरूस्तीच्या कामास विलंब तथा हलगर्जीपणा करणा-या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. कंत्राटाची मुदत दिनांक १०.०४.२०१८ रोजी संपली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दादर (मुंबई) येथील शारदाश्रम शाळेचे नाव एसव्हीएम इंटरनॅशनल स्कूल करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(६) * ११८७३९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील शारदाश्रम शाळेचे नाव एसव्हीएम इंटरनॅशनल स्कूल करुन शाळा आयसीएसई मंडळाशी संलग्न करण्याच्या घेतलेल्या बेकायदेशीर निर्णयाची चौकशी करण्याचे आदेश प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी दिनांक ०३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रशासनाला दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर शाळेबरोबरच राज्यातील अनेक शाळा व्यवस्थापनांनी अशाच प्रकारचे निर्णय घेतलेले असल्याप्रकरणी सर्वच शाळांची चौकशी करुन कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) सदर शाळेची संलग्नता राज्य मंडळाशी कायम ठेवण्याची विनंती काही पालकांनी निवेदनान्वये शासनास केली होती. सदर निवेदनात नमूद मुद्यांच्या संदर्भात चौकशी करण्याचे निदेश विभागीय उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांना देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकलहरे (जि.नाशिक) औष्णिक वीज केंद्रातील प्रदुषण रोखण्याबाबत

**(७) * १२४९२२ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील एकलहरे औष्णिक वीज केंद्रातील राखेमुळे प्रदुषण होऊन एकलहरे, सामनगाव, कोटमगाव, हिंगणवे या भागातील शेती पिकांवर विपरीत परिणात होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रदुषण रोखण्याची मागणी शेतकरी गत अनेक वर्षापासून करीत असूनही प्रदुषण नियंत्रण मंडळाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.
कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या अहवालानुसार याबाबत तालुका स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर तक्रार प्राप्त नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(८) * १२००४३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील सावित्री, काळ, कुंडलिका, अंबा, पाताळगंगा या बारमाही नद्यांमध्ये मुबलक पाणी तसेच लघुपाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या २८ धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असूनही कोट्यवधी रुपये खर्च केलेल्या जिल्हयातील २६५ गावातील नळ पाणी योजना नादुरुस्त असल्यामुळे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याचे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील अनेक गावांमधील नागरिकांना गत पंधरा ते वीस वर्षांपासून पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत असुन, वडपाले (ता.माणगांव) येथील महिलांना पाण्यासाठी ४ ते ५ किलोमीटर प्रवास करावा

लागत आहे तसेच पेण तालुक्यातील खारेपाटात वसलेल्या मसदबेडी, भोईर कोठा, शिर्कीचाळ नंबर एक, शिर्कीचाळ नंबर दोन, माऊली वाडी, आंबावाडी, सागरवाडी, म्हसोबावाडी, गणेश वाडी, पाटील वाडी, सीमावाडी, हरिभाऊ वाडी, दरबार वाडी, गौळोबा वाडी, आदि वाडयांवर नियोजनाअभावी पाणी टंचाई निर्माण होत असल्याने उक्त तालुक्यातील १३६ गावे व १२४ वाडयांवरील पाणी टंचाई दूर करण्याकरीता जेएसडब्ल्यूचे २, खाजगी २, शासकीय २ अशा सहा टँकरद्वारे तालुका प्रशासनाने सुरू केलेला पाणी पुरवठा कमी पडत आहे. तसेच पनवेल तालुक्यातील गिरवले, खैरवाडी, आकुळवाडी, गुळसूंदे, कोळखे, सोमटणे, पोसरी, नितळस, कर्नाळा, शिरढोण, नेवाळी, देवळोली, चिंध्रण या १३ गावांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत राबविण्यात आलेली नळ पाणी पुरवठा योजना निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याने उक्त १३ गावातील पाणी पुरवठा योजनेसाठी ८,६६,८२००० रूपये मंजूर निधीपैकी ३,१,६४,००० रूपये खर्च करण्यात आला असून सदर योजना पूर्ण करण्यासाठी अद्यापही ५,६८,५४००० हजार रूपये निधीची आवश्यकता असून सदर योजना पूर्ण न केल्यास खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार रायगड जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी उपरोक्त योजनांची अंमजबजावणी करणे तसेच यात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर** : (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

वडपाले (ता.माणगाव) हे गाव लोणेरे देवळी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट आहे. या योजनेचे काम सन १९८० मध्ये पूर्ण झालेले असून योजनेचे आयुष्यमान संपलेले आहे. तसेच योजनेतील समाविष्ट गावांना उन्हाळ्यात एक दिवस आड पाणी पुरवठा करण्यात येतो व काहीवेळा वडपाले येथील ग्रामस्थ उन्हाळ्यात दिड किलोमीटर अंतरावरील विहिरीवरुन पाणी आणत आहेत. सदर गावाचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१८-१९ च्या कृती आराखड्यामध्ये करण्यात आलेला आहे.

पेण तालुक्यातील खारेपाटात वसलेल्या वाड्यांसाठी नियोजनाअभावी पाणी टंचाई निर्माण झालेली नाही. संभाव्य पाणी टंचाई कृती आराखड्यानुसार पेण तालुक्यातील ७२ गावे व १६१ वाड्या असे २३३ गावे / वाड्यांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचा प्रस्ताव होता. त्यापैकी ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार २७ गावे व ७२ वाड्या अशा एकूण ९९ ठिकाणी १ शासकीय, २ खाजगी व जे.एस.डब्ल्यू कंपनीचे ३ अशा एकूण ६ टँकरद्वारे उन्हाळ्यात पाणी पुरवठा करण्यात आला आहे. टँकरद्वारे पिण्याचा पाणी पुरवठा कमी पडू दिला नाही.

पनवेल तालुक्यातील १३ गावांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनांची एकूण अंदाजपत्रकीय किंमत रु.९२८.३१ लक्ष इतकी मंजूर असून आजपर्यंत सदर कामांना रु.२१७.३० लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर योजना पूर्ण करण्यासाठी अद्यापी रु.३५३.४९ लक्ष निधीची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत पनवेल तालुक्यातील गिरवले, खैरवाडी, आकुळवाडी, गुळसुंदे, सोमटणे, पोसरी, कर्नाळा, देवळोली, चिंध्रण या गावांना सुरळीत पाणी पुरवठा सुरु आहे. सदरची कामे माहे सप्टेंबर, २०१८ अखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी पाणी टंचाई कार्यक्रम वेळेवर राबविण्यात आला आहे. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत २४८ नळ पाणी पुरवठा योजनांची कामे सुरु आहेत. त्यापैकी २३२ योजनांमधून पाणी पुरवठा सुरु आहे. उर्वरित योजनांतील गावांना अस्तित्वातील योजनेतून पाणी पुरवठा सुरु आहे.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

**(९) * १२२१८३ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधूदुर्ग जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी बोगस समायोजनाच्या आधारे १७ वर्षे सेवेत नसलेल्या बोगस शिक्षक-शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांची नावे शालार्थ संगणकीय ऑनलाईन वेतन प्रणालीमध्ये टाकून वेतन अनुदान व निवृत्तीचे लाभ देणे, शाळा संस्थांचे बनावट रबरी शिक्के व सेवा पुस्तके बनविणे, बनावट कागदपत्रे बनवून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपहार करणे, अशा अनेक बाबींमध्ये गैरव्यवहार व अनियमितता केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शिक्षणाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांना अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने शिक्षण भरतीत केलेल्या गैरव्यवहाराबाबत कास्ट्राईब शिक्षक संघटनेने शिक्षण आयुक्त, पुणे यांचे निवेदनाद्वारे लक्ष वेधले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नियमबाह्य समायोजन झाले आहे तथापि समायोजनाचे आदेश असले तरी संबंधितांना आज अखेर कोणतेही वेतन व भत्ते अदा केलेले नाहीत. त्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) या प्रकरणी समिती गठीत केली असून चौकशी सुरु आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील महाजल पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१०) * १२१४७१ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळयात पाणी टंचाईच्या कामावर लाखो रुपयांचा खर्च होत असताना महाजलच्या १२० पाणीपुरवठा योजनांची कामे अपूर्ण असल्याने ग्रामिण भागात निर्माण होत असलेल्या पाणी टंचाईबाबतची चौकशीची मागणी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांचेकडे गत दीड महिन्यापूर्वी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीचे काम जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने उपविभागीय अभियंत्यांकडे हस्तांतरीत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महाजल अंतर्गत १२० पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण करणे तसेच ग्रामिण भागातील पाणी टंचाई दूर करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा स्तरीय दक्षता समितीच्या दिनांक ०७.०४.२०१८ रोजीच्या सभेमध्ये समितीच्या सदस्यांनी अपुर्ण अवस्थेत असलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाच्या दिनांक ०९.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्तरावरील नळ पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीचे अधिकार काढून घेण्यात आले असून अपूर्ण कामे जिल्हा परिषद स्तरावरून पूर्ण करण्याबाबत आदेशीत केले आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही जिल्हा परिषद मार्फत चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील शाळांमध्ये शालेय पोषण आहाराकरिता तूरडाळ उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) * ११७६७० श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील शाळांना गत दोन महिन्यापासून पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहारात तूरडाळीचा समावेश नसल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर जिल्हयातील शाळांना तूरडाळ न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अहमदनगर जिल्हयातील शाळांना तूरडाळ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) शालेय पोषण आहार योजनेसाठी दि. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई या सहकारी संस्थेमार्फत तूरडाळीचा पुरवठा करण्यात येत आहे. सदर संस्थेने तूरडाळीचा पुरवठा विलंबाने केल्याने शाळांना विलंबाने तूरडाळ प्राप्त झाली. मागणी नुसार तूरडाळ पुरवठा करण्यासाठी दि.महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर, नांदेड व अहमदनगर येथे आरोग्यास हानीकारक असलेल्या बर्फाची विक्री करण्यात येत असल्याबाबत

**(१२) * ११९४२१ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे आरोग्यास हानीकारक असलेल्या बर्फाची बाजारात विक्री करण्यात येत असल्याचे तसेच नांदेड शहर व जिल्हयात बर्फ बनविणारे १०० पेक्षा अधिक कारखाने असून तेथे अशुध्द पाणी वापरुन बर्फ बनविला जात असल्याचे दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)तसेच, अहमदनगर जिल्हयात बर्फ तयार करणा-या एकाही कारखान्याने अन्न व औषध प्रशासनाकडून परवानगी घेतली नसल्याचे तसेच बर्फ निमिर्तीच्या निकषांचे पालन केले जात नसल्याचे दिनांक २० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास माहिती अधिकारातून मिळविलेल्या माहितीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याने यासंदर्भात शासनाने चौकशी करुन विनापरवाना अशुध्द बर्फाची विक्री करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

तथापि, दि.०३/०७/२०१८ रोजी अहमदनगर येथील वैष्णव मंगल आईस फॅक्टरी या पेढीस अन्न परवाना मंजूर करण्यात आला आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाने दि.०१/०४/२०१७ ते ३१/०५/२०१८ या कालावधीत बर्फाचे नागपूर येथून एकूण नमुने,नांदेड येथून ४ नमूने व अहमदनगर येथून ३ नमूने विश्लेशणासाठी घेतले होते.

सदर प्रकरणी नागपूर मधील सर्व नमूने प्रमाणीत घोषित झाले आहेत.

नांदेड येथील १ नमूना प्रमाणित व २ नमूने असुरक्षित आढळले असून १ प्रकरणी अहवाल प्रलंबित आहे. २ असुरक्षित नमुन्याबाबत खटला दाखल करण्यात आला आहे.

अहमदनगर येथील १ नमुना प्रमाणित, २ नमुने असुरक्षित आढळले असून एका असुरक्षित नमुन्याबाबत खटला दाखल करण्यात आला आहे. तर एक आरोपी मृत पावल्याने प्रकरण दप्तरी दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नाशिक जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांना खेळासाठी मैदाने उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) * ११७८४३ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या (जि.नाशिक) ९५० शाळांना खेळासाठी मैदाने उपलब्ध नसल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत असलेल्या १३ हजार ५५६ शाळांमध्ये क्रीडांगणाची सुविधा नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे विविध प्रकारातील खेळांचा सराव कुठे करायचा असा प्रश्न विद्यार्थ्यांपुढे निर्माण झाला असून यात बीड व नाशिक जिल्हयातील शाळांचे प्रमाण सर्वाधिक आहे, हे ही, खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मैदानाविना असलेल्या शाळांना मैदाने उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) ज्या शाळांना खेळाचे मैदान नाही अशा शाळांना शाळा व्यवस्थापन समितीमार्फत ग्राम पंचायत, नगर परिषद, नगर पालिका, महानगरपालिका यांच्याकडे उपलब्ध असलेली जागा मैदानासाठी उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय दि. २९.०६.२०१३ अन्वये आदेश दिले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानीत शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना रुजू करुन घेण्याबाबत

**(१४) * ११७४०७ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानीत शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या ३३३१ माध्यमिक विभागांमार्फत येणाऱ्या शिक्षकांना रुजू करण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिल्यानंतर त्यानुषंगाने अंमलबजावणी न करणाऱ्या माध्यमिक शाळांचे अनुदान बंद करण्यात येईल, असा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती माध्यमिक शाळांनी शासनाच्या आदेशानुसार किती अतिरिक्त शिक्षकांना रुजू करुन घेतले आहे, तसेच किती माध्यमिक शाळांचे अनुदान बंद करण्यात आले आहे,

(३) तसेच, शैक्षणिक वर्ष संपत आले तरीही राज्यातील माध्यमिक शाळांची संच मान्यता तसेच शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाले नसल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, कोल्हापूर जिल्हयातील शाळांचे मुख्याध्यापक समायोजन करण्यास टाळाटाळ करीत असल्याने या पदाची गरज नसल्याचे समजून ३१ शाळांतील ४९ शिक्षकांची पदे रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालकाकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मुंबई आणि परिसरातील गुजराती आणि मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षकास हजर करुन घेण्यास नकार दिल्यास शासन निर्णय दि.४.१०.२०१७ मधील मुद्दा क्रमांक २(xi)अन्वये पद व्यपगत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२) जिल्हास्तरावर १४६५ शिक्षकांचे समायोजन झाले असून, त्यापैकी ८९१ शिक्षकांना रुजू करुन घेतले आहे. २०१ शाळांनी रुजू करुन न घेतल्याने संच मान्यतेतून पद व्यपगत करावयाची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.सन २०१७-१८ च्या संचमान्यता मे २०१८ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सन २०१६-१७ च्या संचमान्यते नुसार समायोजन करण्यात आलेले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) शासन निर्णय दि.४.१०.२०१७ मधील मुद्दा क्रमांक २(xi) मधील तरतुदी नुसार संचमान्यतेतून पद कमी करुन संचमान्यता देण्याबाबत माध्यमिक शिक्षणसंचालनालयाने दि ०७.०५.१८ अन्वये एन.आय.सी.पुणे यांना २०१ पदे व्यपगत करणेबाबत कळविले आहे. सदर पदांमध्ये कोल्हापूर जिल्हयातील २२ पदांचा समावेश आहे.

मुंबई विभागात ४५० अतिरिक्त झालेल्या शिक्षकांच्या समायोजनासाठी त्यांच्या विषयानुसार पदे रिक्त नसल्याने मूळ शाळेत कार्यरत आहेत.

-----------------

## हिंगोली कापडसिंग (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथील संत रेखेबाबा व संत गजानन माध्यमिक विदयालयात १० वी च्या परिक्षेत अतिरिक्त विदयार्थी आढळून आल्याबाबत

**(१५) * १२२५३५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली कापडसिंग (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथील संत रेखेबाबा विदयालय व संत गजानन माध्यमिक विदयालयात १० वी च्या परिक्षेत अतिरिक्त विदयार्थी आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांचे संस्थाचालक तसेच मुख्याध्यापकांनी संगनमत करुन कोणत्याही भौतिक सुविधा नसतांना १७५ विदयार्थ्याचे ऑनलाईन अर्ज भरुन अनधिकृतरित्या परिक्षेस बसविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक व त्यांचे सहकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) संत गजानन महाराज माध्यमिक विद्यालय, कापडसिंगी, ता.सेनगाव, जि.हिंगोली व रेखेबाबा माध्यमिक विद्यालय, कापडसिंगी, ता.सेनगाव, जि.हिंगोली या शाळेतील संबंधितांविरुध्द गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच, सदर शाळांची मंडळ मान्यता रद्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ऑनलाईन औषधविक्रीला प्रतिबंध करण्याबाबत

**(१६) * ११९६०४ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल),**

**श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन औषधविक्रीला बंदी असतांना www.omsi.in, m.medilife.com व इतर संकेतस्थळांवर औषधांची विक्री होत असून यामध्ये गर्भपाताच्या (एमटीपी) गोळ्यांची बेकायदेशरीपणे विक्री केली जात असल्याचे केमिस्ट असोसिएशनच्या माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन औषध विक्रीचा परवाना न घेता ऑनलाईन औषध विक्रीच्या जाहिराती प्रसिध्द केल्या जात असून सोशल मिडीयाचा वापर करुन गर्भपात, नशेच्या व आरोग्यास घातक औषधांच्या ऑनलाईन उपलब्धतेबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तक्रारी करून व मा.उच्च न्यायालयाने याबाबत अन्न व औषध विभागास आदेश दिले असतानाही याप्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्यास शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन औषध विक्रीमध्ये रुग्णांची गैरसोय होत असून यंत्रणेच्या अभावामुळे फसवणूक होत असल्याने औषध विक्री करणाऱ्या कंपनीवर आणि प्रत्यक्ष औषध विक्री करणारा विक्रेता यामध्ये अव्यापारी स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार ऑनलाईन व बेकायदेशीर औषध विक्रीला प्रतिबंध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) राज्यात ऑनलाईन औषधविक्रीला बंदी असतांना www.omsi.in, m.medilife.com व इतर संकेतस्थळांवर औषधांची विक्री होत असून यामध्ये गर्भपाताच्या (एमटीपी) गोळ्यांची बेकायदेशिरपणे विक्री

केली जात असल्याचे केमिस्ट असोसिएशन, पुणे यांनी माहे मार्च, २०१८ मध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आणले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) अन्न व औषध प्रशासनाने मिळालेल्या माहितीच्या आधारे विविध संकेत स्थळांची पडताळणी केली असून प्रिस्क्रिप्शनवर किंवा प्रिस्क्रिप्शनशिवाय विविध ऑनलाईन पोर्टलद्वारे औषधांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले आहे. ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्या संबधितांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

अन्न व औषध प्रशासनाने मागील ३ वर्षात एकूण ७ प्रकरणी प्रथम खबर अहवाल नोंदविले आहेत. तसेच १४ पुरवठादाराचे परवाने रद्द, ६ पुरवठादाराचे परवाने निलंबित, ४ प्रकरणी न्यायालयात खटले दाखल केले आहेत. ३ प्रकरणी पुरवठादराचे व्यवसाय बंद केल्याने संबधितांनी परवाने रद्द करण्यास्तव सादर केले आहेत. १० प्रकरणी पुरवठादार इतर राज्यातील असल्याने संबधित राज्याच्या औषध नियंत्रकास कारवाई करण्याबाबत कळविले आहे. ४ प्रकरणी तपास / कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेंडूर नाईकवाडी (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदूर्ग) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) * १२४५२९ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंडूर नाईकवाडी (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदूर्ग) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत रुपये ३४ लाख ५६ हजार खर्च करुन सुरु करण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेत संबंधितांनी गैरव्यवहार केल्याचे स्थानिक ग्रामस्थांच्या माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

पेंडूर नाईकवाडी (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत लेखी स्वरुपात कोणतीही तक्रार मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झाली नाही. तथापि, सदर योजनेच्या कामाबाबत दिनांक ०६.०६.२०१८ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) पेंडूर नाईकवाडी (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाबाबत दिनांक ०६.०६.२०१८ रोजी तक्रार प्राप्त झाली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केज (जि.बीड) तालुक्यातील गटसाघन केंद्रातील दहावी व बारावीच्या उत्तरपत्रिका जळाल्याबाबत

**(१८) * १२५५६९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) तालुक्यातील गटसाघन केंद्रात ठेवण्यात आलेल्या दहावी व बारावीच्या विदयार्थ्यांच्या १३०० उत्तरपत्रिका अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे लागलेल्या आगीत जळाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अर्धवट जळत असलेली लाख किंवा मेणबत्ती सतरंजीवर ठेवल्याने सतरंजीने पेट घेतला व त्यामुळे सतरंजीखाली झाकलेल्या उत्तरपत्रिका जळाल्या असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सदर संपूर्ण कामकाज करणारे अधिकारी, कर्मचारी व शिपाई यांनी कर्तव्यात हलगर्जी व निष्काळजीपणा केल्याने सदर उत्तरपत्रिका जळालेल्या आहेत, असे चौकशीत निष्पन्न झाले आहे. यामुळे दोषी अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेहकर (जि.बुलढाणा) येथील गटशिक्षणाधिकारी यांच्या गैरकारभाराबाबत

**(१९) * ११९७२३ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथील गटशिक्षणाधिकारी श्री.किशोर पागोरे यांच्या गैरकारभाराबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मुख्य कार्यपालन अधिका-यांकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे पंचायत समिती सभापती यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बुलढाणा यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात आली असून तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. तथापि, श्री.किशोर पागोरे, गटशिक्षणाधिकारी यांना उध्दट वागणुकीबाबत समज देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील वयोवृध्द कलाकारांना मानधन देण्याबाबत

**(२०) * १२५१२२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील वयोवृध्द कलाकारांना मानधन निवडीचे उदिष्ट वाढवून मिळणेबाबत व निवडलेल्या लाभार्थ्यांचे अनुदान खात्यावर जमा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ पासून सन २०१७-१८ अखरे निवड झालेल्या २४० लाभार्थ्यांचे अनुदान अदयापि त्यांच्या खात्यावर जमा झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यस, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ ते २०१६-१७ या वर्षात १८० पैकी १३० कलाकारांना मानधन अदा करण्यात आलेले आहे. उर्परित ५० कलाकरांचे खाते क्रमांक जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून चुकीचे प्राप्त झाले असल्याकारणाने त्यांच्या खात्यावर मानधन जमा करता आले नाही. सन २०१७-१८ करीता मानधन मंजूर झालेल्या ६० कलाकारांची यादी दिनांक २७ एप्रिल, २०१८ रोजी प्राप्त झाली असून, त्यांचे बँक तपशिल प्राप्त न झाल्याने अद्याप मानधन अदा करण्यात आले नाही.

(३) याबाबत दिनांक ११ व २४ मे, २०१८ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषद, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील शैक्षणिक संस्थांची थकीत असलेली शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत

**(२१) * ११८४२२ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याच्या शासनाच्या निर्णयावर फेरविचार करण्याबाबत व मा.न्यायालयाने शासनाला सूचना देऊनही त्यावर अद्याप विचार न केल्यामुळे कोटयावधी रुपयांच्या थकीत रक्कमेपोटी नाशिक येथील अनेक शैक्षणिक संस्थांना पैसे अदा करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अनेक संस्थामध्ये प्राध्यापकांचे सहा ते आठ महिन्यांचे वेतनही करणे कठीण झाले आहे, हेही खरे आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील उर्वरित थकबाकी संबंधीत संस्थांच्या खात्यात जमा करण्याबाबत दिनांक २१.६.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) नाही.

(३) व (४) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील नाशिक जिल्हयातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या लाभार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये रु.१७.२२ कोटी इतकी रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरित रु.६.३५ कोटी थकबाकी संस्थांना देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

# कोल्हापूर जिल्हयात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करणेबाबत

**(२२) * १२५६९८ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रामध्ये शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात कराड वगळता कोल्हापूर तथा अन्य कोणत्याही जिल्हयात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय नसल्याने या भागातील विद्यार्थ्यांना उक्त शिक्षण घेण्यासाठी अवाजवी शुल्क दयावे लागत असून गरजू व हालाखीची परिस्थिती असलेले विद्यार्थी या शिक्षणापासुन वंचित रहात असल्याने कोल्हापूर जिल्हयात अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची मागणी सन २०१८ मध्ये केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून मा.मुख्यमंत्री महोदयांनी देखील या प्रस्तावास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग (Department of Technology) शासन अनुदानित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग शासन अनुदानित करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या विहित निकषानुसार कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या व त्याकरिता येणारा वार्षिक वित्तीय भार याबाबत सुधारित प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना शिवाजी विद्यापीठाला केल्या आहेत. त्या अनुषंगाने माहिती प्राप्त झाल्यानंतर हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल.

-----------------

## फुटाळा (नागपूर शहर) तलावातील पाणी दुषित झाल्याबाबत

**(२३) * ११८१८६ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील फुटाळा तलावाच्या परीसरातील कचऱ्यामुळे तलावातील पाणी दूषित झाल्याने वनस्पती नष्ट होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावाचे नीरीने तयार केलेल्या अहवालानुसार चार नमुने तपासणीत पी.एच.स्तर ७.१, ६.५, ६.८ व ६.५ असुन त्यात कॅल्शियम, कॉर्बोनेट, क्लोराईड, नायट्रेट आणि सल्फेटचे प्रमाणही निर्धारीत मानकांपेक्षा खूप कमी असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाच्या सौंदर्यीकरणाकरीता राज्य शासनाने केंद्र शासनाला सन २०१२-१३ मध्ये पाठविलेल्या रुपये १२ कोटींच्या प्रस्तावास मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही

निरी नागपुर या संस्थेने सन २०१७-१८ या कालावधीकरीता तयार केलेल्या पर्यावरणीय सद्यस्थिती अहवालानुसार तलावाच्या प्रदूषण पातळीत वाढ होत असल्याचे दिसून येत नाही.

(३) व (४) नागपूर महानगरपालिकेनी फुटाळा तलावाचे पुनरुज्जिवन करण्याचा प्रस्ताव दि. १८ जानेवारी, २०११ रोजी सादर केला होता. सदर प्रस्ताव राज्य शासनाने राष्ट्रीय तलाव संवर्धन योजने अंतर्गत केंद्रशासनाकडे मंजूरीस्तव दिनांक १ऑक्टोबर २०१२ रोजी सादर केला आहे.

सद्यस्थितीत प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.

(५) प्रश्न् उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) शहरातील नदीकाठावर व पात्रात आरोग्यास हानीकारक असलेला जैववैद्यकीय कचरा टाकला जात असल्याबाबत

**(२४) * १२२८४२ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) शहरात बँक ऑफ इंडियाच्या मागील बाजूस नदीकाठावर व पात्रात रिकाम्या सलाईनच्या बाटल्या, हँड ग्लोव्ज, रुग्णालयात वापरलेला कापूस इ.आरोग्यास हानीकारक असा जैव वैद्यकीय कचरा टाकला जात असल्याचे दिनांक १४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कचरा मानव व जनावरांसाठी हानीकारक असून त्यामुळे रोगांची लागण होणे तसेच श्वसनाचे विकार होत असल्याने कचरा टाकणाऱ्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व त्यानुसार कचरा टाकणा-यांवर कोणती कारवाई केली तसेच अशा प्रकारच्या कच-याची विल्हेवाट लावण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २१.६.२०१८ रोजी आरोग्य अधिकारी दापोली व नगरपालिका दापोली यांच्याकडून मागविलेल्या अहवालावरून मुख्य अधिकारी नगरपंचायत, दापोली, दापोली शहरामध्ये सदर ठिकाणी पाहणी केली असता त्या ठिकाणी जैव वैद्यकीय कचरा टाकल्याचे आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगाव, भुसावळ व मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील स्वस्त धान्य गोदामपालांना निलंबित केल्याबाबत

**(२५) * १२४४०४ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव, भुसावळ व मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील स्वस्त धान्याचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी तीनही ठिकाणच्या गोदामपालांना जिल्हाधिका-यांनी निलंबित केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार गोदामपालांव्यतिरिक्त अन्य किती व्यक्तींवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) जळगाव जिल्हयातील सर्व शासकीय गोदामांची तपासणी नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई, तथा राज्यस्तरीय दक्षता पथक प्रमुख, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई व विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या पथकामार्फत दि.२०.०१.२०१८ ते दि.२९.०१.२०१८ या कालावधीत करण्यात आलेली आहे. सदर तपासणीत भुसावळ, चाळीसगाव, मुक्ताईनगर व कुऱ्हा काकोडा येथील गोदामात आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर गोदामांतील दोन गोदाम व्यवस्थापक व दोन गोदामपाल यांना निलंबित करण्यात आले असून दोन पुरवठा तपासणी अधिकारी, तीन पुरवठा निरीक्षक यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच एक पुरवठा निरीक्षक यांचे विरुध्द तात्पुरती एक वेतनवाढ बंद करणे प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भाग, आदिवासी पाडे व सीमा भागात अनुदानित मराठी शाळा सुरु करण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्याचा घेतलेला निर्णय

**(२६) * ११९५३३ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भाग, आदिवासी पाडे आणि सीमा भागात नवीन मराठी शाळा सुरु होण्याची शक्यता संपुष्टात आली असून राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने सन २००९ साली अनुदानित मराठी शाळा सुरु करण्यासाठी बृहत आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन केवळ स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाच्या शाळांनाच परवानगी देणार असल्यामुळे मराठी शाळांचा उक्त आराखडा रद्द करुन अनेक मराठी शाळा बंद करण्यात आल्याने शाळाबाह्य मुलांची संख्याही वाढली असून या निर्णयामुळे कोणीही मराठी शाळा सुरु करण्याचे धाडस करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## मुंबईतील विविध शाळांमधील तुकडी गैरव्यवहाराच्या चौकशी अहवालाबाबत

**(२७) * ११८९७९ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य),**

**श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शाळांमधील १ हजार २४ तुकडया उपनगरातील शाळांमध्ये बेकायदेशीर हस्तातंरित करुन गैरव्यवहार केल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागातील बहुतांश अधिकारी हे आर्थिक व्यवहाराशिवाय एकही नस्ती पुढे पाठवित नसल्यामुळे मुंबईतील अनेक शिक्षकांना त्रास होत असुन याबाबत चौकशी करण्याची मागणी गत वर्षापासून मुंबई शिक्षक लोकशाही आघाडीकडून (टीडीएफ) शालेय शिक्षण विभागाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कोणतीच कारवाई होत नसल्याने टीडीएफ संघटनेने केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे तक्रार अर्ज नोंदविल्यानंतर राज्यातील शिक्षण विभागातील गैरव्यहाराची चौकशी करुन याबाबतचा अहवाल केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाला सादर करावा असे आदेश शालेय शिक्षण विभागाला माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त अहवाल केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे पाठविला आहे काय तसेच सदर अहवालातील निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने गैरव्यहारास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत मुंबई शिक्षक लोकशाही आघाडीकडून मागणी करण्यात आली आहे.
(३) या बाबत टीडीएफ संघटनेने केंद्रीय मुनष्यबळ मंत्रालयाकडे केलेल्या तक्रारीची प्रत व निदेश प्राप्त झालेले नाहीत.
(४) सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रिक्त असलेली प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शक्षिकेत्तर पदे भरणेबाबत

**(२८) * ११७६९८ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली**

**पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तसेच मुंबईतील अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या हजारो जागा रिक्त असतांनाही दिनांक २३ मे, २०१७ रोजी सुधारित आकृतीबंध आणि आर्थिक कारण देत सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीवर बंदी घातली असल्याचे तसेच पात्रताधारकांना तासिका तत्वावर (सीएचबी-क्लॉक हावर बेसिस) तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठांतर्गत असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या अनेक जागा रिक्त असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०११ पासून प्राध्यापक भरती केलेली नसल्याने राज्यातील ४० टक्के महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापकांच्या सुमारे १० हजार जागा रिक्त असून पात्रता धारकांची संख्या ५० हजारांवर गेली असून राज्यभरातील महाविद्यालयात प्राचार्य या मुख्य पदासह एकूण १८ हजारांहून अधिक जागा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विद्यार्थी संख्या वाढत असताना तसेच कॉलेजातील दैनंदिन प्रशासकीय तसेच शैक्षणिक कामकाजाच्या दृष्टीने आणि राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती प्रमाणन (ॲक्रिडिटेशन) मिळण्याकरीता कॉलेजात नियमित प्राचार्य असणे आवश्यक असून अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने महाविद्यालये अडचणीत आल्याने याचा परिणाम नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय मुल्यांकनावर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्राध्यापकांची एकूण ९५११ पदे रिक्त असणे तसेच माहे एप्रिल, २०१८ मध्ये १५०० ते २००० प्राध्यापक निवृत्त होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने प्राध्यापक संघटनेने मा.उच्च

व तंत्र शिक्षण मंत्री आणि मा.वित्त मंत्री यांना दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आपल्या मागण्यांचे निवेदन दिले तसेच पीएचडी/नेट/सेट पात्रता धारक यांनी आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) वित्त विभागाच्या दिनांक २५/५/२०१७ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत आकृतीबंध मंजूर होईपर्यंत पद भरतीस बंदी आहे.

ऑक्टोंबर, २०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार राज्यातील अशासकिय अनुदानित महाविद्यालयातील ९,५११ शिक्षकिय व ८,७९८ शिक्षकेतर अशी एकूण १८,३०९ पदे रिक्त आहेत.

तथापि, वित्त विभागाने प्राचार्याची पदे भरण्यास मान्यता दिल्यानुसार, शासन परिपत्रक दिनांक २३/४/२०१८ अन्वये रिक्त असलेली प्राचार्याची २६० पदे व भविष्यात रिक्त होणारी प्राचार्याची पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या आढाव्यासह रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला आहे.

अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी, तासिका तत्वावर अधिव्याख्यात्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

(४) सन २०१६ मध्ये NAAC मुल्यांकन झालेल्या राज्यातील एकूण २०६ महाविद्यालयांच्या मुल्यांकनाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(अ) "अ" वा त्यावरील दर्जाची महाविद्यालये -६४

(ब) "ब" वा त्यावरील दर्जाची महाविद्यालये -११७

(अ) "क" वा त्यावरील दर्जाची महाविद्यालये -२५

सन २०१७ मध्ये NAAC मुल्यांकन झालेल्या राज्यातील एकुण ३१३ महाविद्यालयांच्या मुल्यांकनाचा तपशिल खालील प्रमाणे आहे:-

(अ) "अ" वा त्यावरील दर्जाची महाविद्यालये -११९

(ब) "ब" वा त्या वरील दर्जाची महाविद्यालये -१८७

(अ) "क" वा त्या वरील दर्जाची महाविद्यालये -७

उक्त बाब पाहता NAAC मुल्यांकनाला फटका बसला असल्याचे म्हणता येणार नाही.

(५) पीएचडी/नेट/सेट पात्रताधारक यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(६) वित्त विभागाच्या सुचनानुसार अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या आढाव्यासह रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला आहे.

-----------------

## तळोजा (नवी मुंबई) येथील औद्योगिक वसाहतीमधील रियल इंडिया फूड्स कंपनी फ्रूटी या थंड पेयाचे बेकायदेशीर उत्पादन करीत असल्याबाबत

**(२९) * ११८४७२ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (नवी मुंबई) येथील औद्योगिक वसाहतीतील रियल इंडिया फूड्स कंपनीने पार्ले ॲग्रो प्रा.लि. कंपनीच्या फ्रूटी या थंड पेया समान फ्रूटिन नावाचे मँगो ज्यूसचे बेकायदेशीर उत्पादन करुन त्याची बाजारात विक्री केल्याचे तसेच फूड ॲण्ड स्टँडर्ड ॲथोरिटी ऑफ इंडिया यांची परवानगी न घेता सदर कंपनीने उत्पादन सुरु केल्याचे कोर्ट रिसिव्हरने केलेल्या तपासणीत निदर्शनास आल्याने या कंपनी विरोधात तळोजा पोलीसांनी अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियमानुसार गुन्हा दाखल केल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रियल इंडिया फूड्स या कंपनीने बेकायदेशीररित्या तयार केलेले फ्रूटिन या थंड पेयाचे उत्पादन गेल्या किती महिन्यापासून बेकायदेशीररित्या सुरु आहे व उत्पादित पेयाचे राज्यात किती ठिकाणी वितरण करण्यात आले आहे, वितरीत केलेला माल व गोडाऊन मधील तयार तसेच कच्चा माल छापा टाकून जप्त करण्यात आला आहे काय, त्याची अंदाजे किंमत किती आहे,

(३) असल्यास, उक्त कंपनीकडे चहा पावडर बनविण्याचा परवाना असून त्याचे नुतनीकरण तसेच अन्य नियमांची पुर्तता केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आह काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर कंपनी व यांस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.
(२) रियल इंडिया फूड्स या कंपनीने माहे फेब्रुवारी, २०१८ पासून फ्रूटीन या थंड पेयाचे उत्पादन सुरु केले असल्याचे व मुंबई-ठाणे परिसरात सँपल म्हणून विक्री केल्याचे तपासात दिसून आले.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी कोर्ट रिसिव्हर यांना कंपनी सील करुन कारवाई करण्याचे दि.१६.०३.२०१८ रोजी आदेश दिले होते. त्यानुषंगाने कोर्ट रिसिव्हर यांनी अंदाजे रु.४०,००० किंमतीचा उत्पादित शितपेयाचा साठा व कच्चा माल जप्त केला आहे.
(३) सदर कंपनीस चहा पावडर बनविण्यासाठी परवानगी दिलेली नसून चहा पावडर, मसाले व कन्फेक्शनरी यांच्या किरकोळ विक्री करीता अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत नोंदणी मंजूर करण्यात आली आहे. सदर नोंदणीच्या नुतनीकरणाचा परवाना दिनांक ०६.०९.२०२० पर्यंत आहे.
(४) रॉयल इंडिया फुड्स या पेढीने फ्रूटीन या थंड पेयाचे विनापरवाना उत्पादन केल्याने सदर पेढीविरुध्द अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ चे कलम ६३ नुसार न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) शहरात अनधिकृत विहिरी खोदण्यात आल्याबाबत

**(३०) * ११९८३८ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) शहरास पाणी पुरवठा करणा-या वागदर्डी धरण क्षेत्रात ३५ अनधिकृत विहिरी खोदण्यात आल्या असून या विहिरींतून बेकायदेशीर पाणी उपसा होत असल्यामुळे मनमाड शहरात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी मुख्याधिकारी, मनमाड नगर परिषद यांनी दिनांक ७ मे, २०१८ रोजी तहसिलदार, चांदवड व दिनांक १५ मे, २०१८ रोजी उपविभागीय अधिकारी, उपविभाग चांदवड यांच्याकडे लेखी पत्राद्वारे सदरच्या अनधिकृत विहिरी बंद करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार या अनधिकृत विहिरींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) उपविभागीय अधिकारी, चांदवड यांनी स्थानिक तलाठी/मंडळ अधिकारी यांचेमार्फत चौकशी केली असून पाणी उपसा करणा-या शेतक-यांना तलावालगतच्या/ धरणालगतच्या ५०० मीटरच्या आत पिण्याच्या पाण्याच्या व्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी विहिरीस प्रतिबंध करण्याचे, किंवा टंचाई कालावधी संपुष्टात येईपर्यंत विहिरीतून पाणी उपसा करण्याचे मनाई आदेश दि.२४.०५.२०१८ अन्वये पारीत केले आहेत. तसेच सदर आदेशान्वये उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, चांदवड यांना त्यांचे अधिपत्याखालील अनधिकृत पाणी उपसा करणा-या शेतक-यांचे विद्युत जोडणी बंद करण्याचे देखील आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कोथुर्डे (ता.महाड, जि.रायगड) धरण परिसरातील आदिवासी वाड्यांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३१) * १२३९८८ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथुर्डे (ता.महाड, जि.रायगड) धरण परिसरातील आदिवासी वाड्यावर गत ४० वर्षापासून पाणीपुरवठा होत नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धरण क्षेत्रालगत असलेल्या गावामुळे या गावात कृषी वन सामाजिक वनीकरण विभागाकडून अद्यापपर्यंत कोणत्याही योजना राबविण्यात आलेल्या नसल्याने कोथुर्डे आदिवासी वाडयांकरिता विशेष योजना राबविण्याची ग्रामस्थांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

रोहा वन विभागामार्फत मौजे कोथुर्डे गावात जिल्हा वार्षिक योजना सन २०१३-१४ अंतर्गत सिमेंट बंधारा बांधण्याचे काम करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०१३ मध्ये मिश्र प्रजातीच्या ५००० रोपांची लागवड करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये वनतळे खोदण्याचे काम करण्यात आले आहे.

कोथुर्डे गावात कृषी विभागातर्फे पुढीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात आले आहेत :- १) महात्मा फुले जलभूमी संधारण अभियान सन २०११-१२, २) गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम सन २०११-१२, ३) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सन २०१२-१३, ४) एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमा अंतर्गत अ) नैसर्गिक साधन-संपत्ती व्यवस्थापन उपचार सन २०१३-१४, सन २०१६-१७, सन २०१७-१८ ब) प्रेरक प्रवेश उपक्रम कामे सन २०१२-१३ व क) उपजीविका कार्यक्रम सन २०१६-१७ व सन २०१७-१८.

कोथुर्डे आदिवासी वाड्याकरीता विशेष योजना राबविण्याबाबत वन विभाग अथवा कृषि विभाग यांच्याकडे लेखी मागणी प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यात मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकारानुसार (आरटीई) शाळांमध्ये प्रवेश मिळत नसल्याबाबत

**(३२) * १२४५५४ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) मधून प्रवेश मिळालेल्या शाळेत प्रवेश देण्यास शाळांकडून पालकांना नकार व दिरंगाई करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे जिल्ह्यातील मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (आरटीई) मधून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून उक्त शाळा ट्यूशन फी, शैक्षणिक साहित्य, गणवेश, स्पोर्ट्स व एक्स्ट्रा करिक्युलम ॲक्टीव्हीटी अंतर्गत अवाजवी शुल्क घेत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, पुणे शहरात दुसऱ्या फेरी अखेर अनेक विद्यार्थ्यांना अद्यापही प्रवेश मिळाला नसल्याने शैक्षणिक वर्ष वाया जाण्याच्या भितीने आर्थिक दुर्बल घटकातील पालकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामटेक (जि.नागपूर) येथील मुख्यमंत्री पेयजल योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३३) * १२१७५९ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथे मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत टप्पा १ मध्ये कामे मंजूर करुन निधी मंजूर करण्यात आला असतांनाही कामे सुरु करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कामे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत व टप्पा २ मध्ये उर्वरित निधी कैंव्हापर्यंत मंजूर होणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, या कामांची निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे काय तसेच सदरील कामे किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रामटेक तालुक्यातील १) मौ. भंडारबोडी, २) मौ.वंडम्बा, ३) शितलवाडी व ४) कांद्री येथील नळ पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली असून त्या करिताची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. योजनेच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदर योजनांची कामे पुर्ण होण्यासाठी १५ महिने इतका कालावधी लागणार आहे. सदर योजनांच्या अंमलबजावणीकरिता जिल्हा परिषदेस रु. २९१.३० लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठातील गैरव्यवहाराबाबत

**(३४) * १२३३४० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विदयापीठाचे कुलगुरु यांच्या बंगल्याच्या सुशोभिकरणासाठी अकारण खर्च केला असल्याचे दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या विद्यापीठात संशोधन, प्रकाशन, प्रश्नपत्रिका, नियमबाहय नियुक्त्या तसेच शैक्षणीक साहित्य खरेदीतही गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) आणि (३) प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे कुलगुरु यांच्याविरध्द बऱ्याच तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींची चौकशी करण्याबाबत एक समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालावर शासनस्तरावर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: ठाणे व मुंबईतील अनेक तंत्रशिक्षण संस्थांमध्ये नियमबाह्य पध्दतीने अभ्यासक्रम सुरु असल्याबाबत

**(३५) * ११९७५८ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: ठाणेसह मुंबईतील तंत्रशिक्षणाचे धडे देणाऱ्या अनेक संस्थांमध्ये काही अभ्यासक्रम हे नियमाबाहय पध्दतीने चालविले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आठ अभ्यासक्रम बंद करण्याबाबत उक्त संस्थाना आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त संस्था कोणत्या आहेत व नियमबाह्य पध्दतीने चालविलेले अभ्यासक्रम कोणते आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अभ्यासक्रम बंद केल्याने त्यामध्ये शिकत असलेल्या विदयार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीने कोणती पर्यायी व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: सातारा जिल्हयातील दुध भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३६) * १२३०४२ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तबेल्यातून विकले जाणारे ७१ टक्के आणि बंद पिशव्यामधून विकले जाणारे ब्रँडेड दुधाचे ६५ टक्के नमूने सदोष असल्याचे तसेच सातारा जिल्हयातील १३ दूध डेअऱ्यांचे नमुने कमी दर्जाचे असल्याची माहिती कंझ्युमर गायडन्स सोसायटी ऑफ इंडिया (सीजीएसआय) यांनी केलेल्या तपासणीमध्ये आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यात सातारा तसेच इतर जिल्हयातील कोणत्या डेअऱ्यांचे नमुने कमी दर्जाचे आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) कंझ्युमर गायडन्स सोसायटी ऑफ इंडिया (सीजीएसआय) या संस्थेने प्रसिध्द केलेल्या अहवालाच्या विश्वासार्हतेबाबत खात्री नसल्याने उपरोक्त अहवालाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली नाही.

तथापि, अन्न व औषध प्रशासनाच्या नियमीत कामकाज व विशेष मोहिमा अंतर्गत सातारा जिल्हयात सन २०१७-२०१८ या कालावधीत घेण्यात आलेल्या दूधाच्या एकूण ११० नमुन्यांपैकी १९ नमुने अप्रमाणित दर्जाचे आढळून आलेले आहेत. सदरचे १९ अप्रमाणित नमूने १३ डेअरीमधील आहेत. १९ नमुन्यांपैकी १२ प्रकरणी न्यायनिर्णय अधिकारी यांनी रु.१,४८,०००/- दंड ठोठवला असून उर्वरीत ०७ प्रकरणे न्यायनिर्णयास्तव प्रलंबित आहेत.

राज्यात सन २०१७-१८ या कालावधीत दुधाचे २१३८ नमुने विश्लेषणाकरीता घेण्यात आले. त्यापैकी १६३९ नमुने प्रमाणित दर्जाचे, ०१ नमुना असुरक्षीत, ३९० नमुने कमी दर्जाचे आढळले असून १०८ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. राज्यात सन २०१७-१८ या कालावधीत १६७ प्रकरणे न्यायनिर्णयासाठी व ८३ प्रकरणे तडजोडीसाठी दाखल करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाली देवद (सुकापूर) (ता.पनवेल, जि.रायगड) येथील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सार्वजनिक निधीचा अपहार केल्याबाबत

**(३७) * ११६६३८ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली देवद (सुकापूर) (ता.पनवेल, जि.रायगड) येथील पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सार्वजनिक निधीचा अपहार केला असून रायगड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने आपला अहवाल माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालात इतर कोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पनवेल तालुक्यातील पाली देवद (सूकापूर), ता.पनवेल, जि.रायगड येथील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने सार्वजनिक निधीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने डिसेंबर, २०१७ मध्ये चौकशी केली आहे. चौकशीमध्ये प्रथमदर्शनी अनियमितता झाल्याचे दिसून आले आहे. या योजनेचे सन २०१४-१५ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षांचे सनदी लेखापाल यांच्यामार्फत लेखा परिक्षण झालेले आहे. ग्रामपंचायत, पाली देवद यांनी मंजूर केलेल्या ठरावानुसार या योजनेचे सन २०१४-१५ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे फेर लेखा परिक्षण करण्याकरीता स्थानिक निधी लेखा यांना कळविले आहे. तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल व कार्यकारी अभियंता, महारष्ट्र जीवन प्राधिकरण, पनवेल यांच्यामार्फत अनियमिततेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३८) * १२०३७३ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी यांच्या कारभाराच्या चौकशीचे आदेश शिक्षण उपसंचालक यांनी माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये अनियमितता व बोगस शिक्षक मान्यता, मुख्याध्यापक मान्यता, शाळांच्या स्वमान्यता, प्रथम मान्यता असे शिक्षण विभागात नियमबाह्य पद्धतीने काम करीत असल्याने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) प्राथमिक शिक्षण संचालनालयाने त्यांच्या दि.२.२.२०१८ च्या पत्रान्वये चौकशीचे आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना दिले आहे.

(२) एक उपशिक्षिका व एक मुख्याध्यापिका यांच्या मान्यतांना अनाधिकाराने वैयक्तिक मान्यता देऊन तद्नंतर त्यास स्थगिती दिली आहे.

(३) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह परिपूर्ण अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त यांना दिले आहे. तसेच संबंधित शिक्षणाधिकारी यांची तक्रारीमुळे बदली करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यासाठी स्वतंत्र वॉटर ग्रीडींग योजना आखून दुष्काळी गावांना पाणी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३९) * १२४०६१ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासाठी स्वतंत्र वॉटर ग्रीडींग योजना आखून दुष्काळी गावांना पाणी उपलब्ध करून देण्याबाबत मेकोरोट डेव्हलपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस कंपनी विविध बाबींचा अभ्यास करुन व अहवाल सादर करुन विविध पर्याय सुचविणार असून त्या पर्यायामधील महाराष्ट्र शासनास जो पर्याय योग्य वाटेल त्या पर्यायावर मेकोरोट कंपनी प्राथमिक संकल्पन अहवाल सादर करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार इस्त्राईलच्या मे.मेकोरेट डेव्हपमेंट ॲण्ड एंटरप्रायजेस कंपनीने कामाला सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे व उक्त योजना किती कालावधीत पूर्ण होणार आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) इस्त्रायलच्या मेकोरोट डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड एंटरप्रायजेस कंपनीने अहवाल तयार करण्याचा कामाला सुरुवात केलेली आहे. सदर कंपनीने मागणी केलेली विविध विभागांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरहू अहवाल तयार करण्यास दोन वर्षाचा कालावधी देण्यात आलेला आहे.

-----------------

## मासाळवाडी (ता.बारामती, जि.पुणे) ग्रामपंचायतीत राष्ट्रीय ग्रामीण विकास पेयजल योजनेत झालेला गैरव्यवहार

**(४०) * १२४५०९ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मासाळवाडी (ता.बारामती, जि.पुणे) ग्रामपंचायतीत राष्ट्रीय ग्रामीण विकास पेयजल कार्यक्रमांतर्गत ४७ लाखांची योजना मंजूर करण्यात आली असून सदरहू योजनेत गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेत लाभार्थींच्या बनावट सह्या, योजनेचे काम चुकीचे होणे, पाण्याची सोय नसतानाही विहीरीवर खर्च करणे, पाण्याचा स्त्रोत न तपासणे, ठेकेदारांकडून साध्या पावत्यांवर मोठ्या रकमा देणे, ठेकेदारास रोख रकमा व अरेखांकित धनादेश देणे इ. प्रकारे गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे अशंत: खरे आहे.

योजनेच्या कामाची काही रक्कम समितीमार्फत अरेखांकित धनादेशाव्दारे ठेकेदारास दिल्याचे लेखापरिक्षणामध्ये निर्दशनास आले आहे. त्यानंतर रेखांकित धनादेशाव्दारेच रक्कम अदा करण्यात आली. तथापि, लाभार्थींच्या बनावट सहया, पाण्याची सोय नसतांनाही खर्च करणे, पाण्याचा स्त्रोत न तपासणे, ठेकेदाराकडून साध्या पावत्यांवर मोठया रकमा देणे, ठेकेदारास रोख रकमा देणे या बाबी आढळून आल्या नाहीत. मंजूर अंदाजपत्रक व मुल्यांकनापेक्षा जादा रक्कम ठेकेदारास अदा करण्यात आलेली नाही.

(३) अरेखांकीत धनादेश देण्याबाबत समितीस रेखांकित धनादेशाव्दारे ठेकेदारास देयकाची रक्कम अदा करणेबाबत उप अभियंता यांचेमार्फत कळविण्यात आले व त्यानंतर पुढील सर्व धनादेश रेखांकित देण्यात आले.

बंडगरवस्तीकडे जाणारी वितरण व्यवस्था कमी खोलीवर टाकण्यात आल्याचे निर्दशनास आले. ती पुन्हा अंदाजपत्रकाप्रमाणे खोलीवर टाकण्यात आली आहे.

योजनेतील पाण्याचा नमुना तपासणी अहवाल राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर व मंजूर योजनेतील विहीरीस पुरेसे पाणी असल्याची खात्री करुन योजनेची कामे हाती घेण्यात आली. योजना पुर्ण करुन ती कार्यान्वित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानात तूरडाळ उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४१) * १२०४१३ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानात ५५ रुपये किलो तूरडाळ विक्रीसाठी आली असताना मार्च महिना संपला तरी अनेक स्वस्त धान्य दुकानातील ग्राहकांना तूरडाळ उपलब्ध करुन देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्राहकांनी तहसिलदार, आंबेगाव यांचेकडे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धामापुर (जि.सिंधुदुर्ग) तलावातील अनधिकृत कामांवर कारवाई करण्याबाबत

**(४२) * ११९१२७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामापुर (जि.सिंधुदुर्ग) तलावात प्रदुषण पसरवणा-या व जैवविविधतेला धोका पोहोचवणा-या अनधिकृत कामासंदर्भात येथील पर्यावरणप्रेमींनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग तहसिलदार, कुडाळ यांचेकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर तलावामध्ये प्रदुषण पसरवणाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोणत्याही कामाबाबतची तक्रार एप्रिल २०१८ व त्या दरम्यान महसूल विभागाकडे प्राप्त झाली नसल्याचे विभागाकडून केलेल्या चौकशीअंती आढळून आलेले आहे.

तथापि सदर धामापूर तलावाच्या काठाने पाथवे बांधण्याचे काम महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळकडील पर्यटन निधीमधून व जलसंपदा विभागाच्या परवानगीने सा. बां. विभागामार्फत हाती घेण्यात आले असून सदर कामाबद्दल राष्ट्रीय हरीत लवादाकडे दाखल तक्रारीच्या सुनावणीत राष्ट्रीय हरीत लवादाने दि. १२/१/२०१७ रोजी स्थगिती दिलेली आहे.
(२) व (३) प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(४३) * १२५३७८ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतक-यांना सहाय्य म्हणून अन्न सुरक्षा योजनेत दरमहा प्रती व्यक्ती ५ किलो धान्य वाटप करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यात सन २०१४ नंतर सदर योजनेत समावेश करण्यात आलेल्या शेतकरी कुटंबाना उक्त योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संग्रामपूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

राज्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याची घटना होऊ नये यादृष्टीने औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) मधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट न झालेल्या शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो याप्रमाणे अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

(२) संग्रामपूर तालुक्यामध्ये एपीएल (केशरी) मधील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेले २४,२९५ शेतकरी लाभार्थी असून त्यांच्याकरिता प्रतिमाह ९७२ क्विंटल गहू व २४३ क्विंटल तांदळाचे नियतन देण्यात येते. त्यापैकी माहे मे, २०१८ मध्ये २३,०६९ लाभार्थ्यांना ९२२.७५ क्विंटल गहू व २३१.०२ क्विंटल तांदळाचे वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील शाळांमध्ये खिचडी शिजवण्याकरिता गॅस सिलिंडर उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) * १२१४४९ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय पोषण आहार योजनेतून खिचडी शिजविण्यासाठी गॅस सिलिंडर देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला असला तरी नाशिक जिल्ह्यातील बहुतांश शाळांमध्ये गॅस सिलिंडर मिळाले नसल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शाळांना गॅस सिलिंडर वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नाशिक जिल्हयामध्ये एल.पी.जी. गॅस सिलेंडर जोडणीचे अनुदान बँकेच्या तांत्रिक अडचणींमुळे पात्र शाळांना विलंबाने प्राप्त झाले आहे. सदर शाळांना गॅस सिलेंडर जोडणी देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूरातील संभाजीनगर येथील क्रीडा संकुलाच्या प्रलंबित कामांबाबत

**(४५) * १२५७०२ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा व सलंग्न सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या पाच जिल्हयांसाठी शासनाने सन २०१० मध्ये कोल्हापूर येथील संभाजीनगर या ठिकाणी क्रिडा संकुल उभारण्यास परवानगी दिली असून सदरच्या क्रिडा संकुलाच्या पहिल्या टप्प्याचे कामासाठी देण्यात आलेल्या एकूण रू.२४ कोटींपैकी १७ कोटी रुपये खर्च करून देखील सदरची अनेक कामे ही अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्रिडा संकुलाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे तसेच जलतरण तलावाचे व डायव्हिंग तलावाचे पाणी मुरत असल्याने ते अपूर्ण अवस्थेत असणे, शुटींग रेंजचे काम प्रलंबित असल्याने त्याचा वापर करता येत नसणे, बास्केटबॉल व हॉलीबॉलचे मैदान हे आंतरराष्ट्रीय मानांकनाला अनुसरुन बनविण्यात आलेले नसणे, खो-खो व कबड्डीचे मैदानात दगड असणे तसेच त्याठिकाणी महिला व पूरूषांसाठी स्वच्छता गृह व पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयाला पूर्णवेळ व कायमस्परूपी क्रिडा अधिकारी नसल्याने क्रीडा संकुलाची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरच्या क्रिडा संकुलामध्ये लवकरात लवकर सुधारणा करण्याकरीता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) कोल्हापूर विभागीय क्रीडा संकुलाच्या कामासाठी देण्यात आलेल्या रु.२४ कोटीपैकी रु.१७ कोटी खर्च झालेला आहे, ही बाब खरी आहे. तथापि, खर्च करुन देखील अनेक कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे नाही.
(२) कोल्हापूर विभागीय क्रीडा संकुलाच्या कामांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे नाही. संकुलातील सर्व क्रीडांगणे त्या त्या खेळांच्या आंतरराष्ट्रीय मानांकन व मोजमापाप्रमाणे बनविण्यात आलेली असून खेळाडूंच्या वापरात आहेत. त्याचप्रमाणे क्रीडा संकुलात टेनिस, शूटिंग रेंज व जलतरण तलाव याठिकाणी महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह सुविधा उपलब्ध असून त्याचा वापर करण्यात येतो. तसेच स्पर्धा व प्रशिक्षण कालावधीमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येते. जलतरण व डायव्हिंग तलावाचे पाणी मुरत नसून बाहेरील सांडपाणी व पावसाच्या पाण्याच्या दाबाने जलतरण तलावामध्ये खालील पृष्ठ भागातून पाणी येत असल्याने काम बंद असून अपूर्ण अवस्थेत आहे. त्याचप्रमाणे शुटींग रेंजचे काम पूर्ण असून यासाठी आवश्यक अत्याधुनिक साहित्य खरेदी करणे बाकी आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जैतापूर (ता.जि.सातारा) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत विहिरींसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४६) * १२५७६१ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जैतापूर (ता.जि.सातारा) येथे राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत अंदाजे रुपये ३० लक्ष इतक्या रक्कमेचे काम पुर्ण होऊन योजना कार्यान्वित झालेली असून विहीर खोदायचे किंवा नदीत जॅकवेल टाकून पाणी उचलण्याचे अंदाजपत्रक करण्यात आले नसल्याने गावातील सुमारे २००० ग्रामस्थांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीची क्षमता कमी झाल्याने सदर योजनेत पाण्याची टाकी, पंपहाऊस व पाईपलाईन सोबतच विहीरीची क्षमता वाढवण्याची किंवा नदीत जॅकवेल टाकून पाणी उचलण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात न आल्याने संपूर्ण गावास पाणीपुरवठा करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी वेळेवर व पुरेसे उपलब्ध होण्याबाबत जॅकवेल किंवा विहिर क्षमतावाढीसाठी मुख्यमंत्री पेयजल योजनेमधून निधी मंजूर करण्याची मागणी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांना प्रत्यक्ष भेटून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सदर गावातील योजनेचे काम पुर्ण करुन एप्रिल, २०१६ मध्ये योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदर योजनेव्दारे गावास सुरळीत पाणी पुरवठा होत असल्यामुळे ग्रामस्थांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत नाही.

(२) हे खरे नाही.

आस्तित्वातील विहीरीचा गाळ काढणे या बाबीचा समावेश अंदाजपत्रकात केला होता व त्यानुसार विहीरीतील गाळ काढून सदर विहीरीवरुन गावास योग्य प्रमाणात पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे आहे.

(४) गावाचे विस्तारिकरण झाल्याने व नदीपात्रातील वाळू उपशामुळे भविष्यात विहिरीचे पाणी कमी पडण्याची शक्यता गृहित धरुन भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत आहे व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नविन क्रीडापटूंसाठी केंद्र शासनाकडून आलेला निधी परत पाठविल्याबाबत

**(४७) * १२००८३ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात क्रीडा विभागाने क्रीडापटू तयार करण्यासाठी केंद्र शासनाकडून देण्यात आलेला सन २०१४-१५ व २०१५-१६ चा निधी परत केल्याचे तर क्रीडा संकुलाच्या उभारणीच्या कामासाठी निधीच उपलब्ध करुन न दिल्याचे कॅगच्या अहवालातून माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच क्रीडा विभागाकडे निधी उपलब्ध असूनही खेळांडूसाठी कॅम्प न भरणे, पुणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद आणि अमरावती येथे उभारण्यात आलेल्या क्रीडा संकुलाची योग्य ती निगा राखली जात नसणे, खेळाडू नव्याने निर्माण करण्यासाठी कार्यवाही न करणे या बाबी कॅगच्या माध्यमातून निदर्शनात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त निधी खर्च न करणा-या संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०१६-१७ यावर्षाकरिता माहे जानेवारी, २०१७ मध्ये तरतूद प्राप्त झालेली होती. तथापि याच महिन्यामध्ये काही खेळ प्रकारांच्या संघटनेद्वारा राष्ट्रीय स्पर्धा व प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन असल्याने व माहे फेब्रुवारी व मार्च या महिन्यामध्ये खेळाडूंच्या १० वी व १२ वी च्या परिक्षांचा कालावधी असल्याने प्रशिक्षण आयोजित होऊ शकले नाही.

पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती विभागीय क्रीडा संकुलांमध्ये नियमित प्रशिक्षण व स्पर्धा उपक्रमाकरिता होत आहे. त्याचप्रमाणे संकुलांची देखभाल व स्वच्छता राखण्यात येत आहे.

जिल्हा क्रीडा संकुल, रत्नागिरी येथे बहुउद्देशिय हॉल, व्यायामशाळा, बास्केटबॉल कोर्ट, खो-खो मैदान, कार्यालयीन इमारत, जलतरण तलाव इ. क्रीडा बाबी पूर्ण झालेले आहे. त्याचा वापर खेळाडू व नागरिकांद्वारे होत असून त्याची योग्य देखभाल व स्वच्छता करण्यात येते.

राज्यामध्ये ११ क्रीडा प्रबोधिनीमध्ये १६ क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण खेळाडूंना देण्यात येते. तसेच ३० खेळाडूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारने सन्मानित करण्यात आलेले आहे.

तसेच जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र व तालुकास्तरावर तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र योजनेंर्तगत उपलब्ध क्रीडा मार्गदर्शकाद्वारे नवोदित खेळाडूंना विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांच्या उपजत क्रीडा गुणांना वाव देवून नवीन खेळाडू निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

## अजिंठा लेणी (जि.औरंगाबाद) येथील जलवाहिनीची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * १२३३४१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील जगप्रसिध्द अजिंठा लेणी येथे पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी औरंगाबाद-जळगांव महामार्गालगत फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया गेल्याचे दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) होय.

राष्ट्रीय महामार्ग विस्तारीकरणाचे काम चालू असतांना जलवाहिनी फुटल्याचे आढळून आल्याने तात्काळ पंपिग थांबविण्यात आले व दिनांक ४ मे, २०१८ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जलवाहीनीची दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरळीत चालू करण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यात अन्न सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थ्यांना धान्य मिळत नसल्याबाबत

**(४९) * १२४११९ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) या दुष्काळी तालुक्यात अन्न सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थ्यांना धान्य मिळत नसल्याचे माहे जून, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा व शिरुर या तालुक्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना, प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना तसेच, एपीएल (केशरी) शेतकरी लाभार्थ्यांना माहे जून, २०१८ च्या पहिल्या सप्ताहापासून अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील वेताळवाडी किल्ल्याच्या संवर्धनाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५०) * १२२०६० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ऐतिहासिक वेताळवाडी किल्ल्याचे संवर्धन करण्यासाठी चार कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून किल्ल्याच्या संवर्धनाचे काम निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार निकृष्ट दर्जाचे काम करणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

वेताळवाडी किल्ल्याच्या संवर्धनाकरिता सुमारे रु.४.०९ कोटी निधी मंजूर झाला आहे. तथापि, सदर किल्ल्याच्या संवर्धनाचे काम निकृष्ट दर्जाचे निदर्शनास आले, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.